अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २४ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २३४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८





# विठुरायासह समर्थांच्या पदरात, सरकारने भरभरून टाकले दान

✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूरचा श्री विठुराया आणि अक्कलकोटमधील श्री स्वामी समर्थ यांच्या पदरात राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने भरभरून दान टाकले आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत या दोनही शहरांचा कायापालट होणार आहे.पंढरीच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा ७३ कोटी ८० लाखांचा तर अक्कलकोटसाठी ३६८ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता. मंगळवारी मुंबईत झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत या दोनही प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. त्यामुळे या दोनही शहरांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.**

## ● पंढरपूर आणि अक्कलकोटचे रूप पालटणार

### ■ गर्दी होणाऱ्या मंदिरांचे डिजीटल मॅपिंग करावे : मुख्यमंत्री
### ■ पंढरपूर शहरातील रस्त्यांच्या डागडुजीसाठी
### ■ नगरविकास विभागाकडून १० कोटी रुपयांचा निधी



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शिखर समितीची बैठक झाली. त्यात हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात ही बैठक झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह खासदार जय सिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, सुभाष देशमुख, समाधान अवताडे, शहाजीबापू पाटील, राम सातपुते, रणजीत सिंह मोहिते-पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यातील ज्या मंदिर, देवस्थानांमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते, त्यांचे डिजिटल मॅपिंग करण्यात यावे. जेणेकरून भाविकांना अधिकाधिक चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरातील सर्व रस्त्यांची करण्यात यावी. रस्त्यावर एकही खड्डा दिसता कामा नये. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाने तातडीने १० कोटी रुपयांचा निधी पंढरपूर नगरपरिषदेस वितरित करावा, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी याप्रसंगी बोलताना दिले.

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, वारकरी केंद्रबिंदू ठेवून पंढरपूर मंदिर विकास आराखड्याची अंमलबजावणी करा. मंदिराचे प्राचीन वैभव कायम ठेवत भाविकांची सुरक्षा आणि सोयीसुविधा यांची सांगड घालण्याचे काम करा. यात्रेसाठी लाखो भाविक पंढरपुरात येत असतात अशावेळी घाट सुशोभीकरण, रस्ते दुरुस्ती तसेच विविध सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. त्यासाठी यात्रा अनुदान ५ कोटींवरून १० कोटी रुपये करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

### डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर...

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने काही शिफारशी केल्या असून त्यामध्ये नवीन बांधकाम करताना मुख्य मंदिराशी सुसंगत काळे किंवा लाल पाषाणांचा वापर करणे, मंदिर संवर्धनातील कामात बदल वा सुधारणा, नव्याने बांधकाम करणे यासाठी संनियंत्रण करण्याकरिता समिती गठीत करण्याच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून उच्चाधिकार समितीच्या संमतीशिवाय कोणतेही काम हाती घेण्यात येणार नाही, असे सादरीकरणाच्या वेळी सांगण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात भाविकांसाठी ऑनलाईन आणि डिजीटल प्लॅटफॉर्मचा वापर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

### पंढरीचे रूप असे पालटणार...

पंढरपूर मंदिर विकास आराखड्यात ७३ कोटी ८० लाख रुपयांची विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. त्याचे सादरीकरण पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी केले. या आराखड्यानुसार श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिराचे जतन आणि संवर्धन, पायाभूत सुविधा, गर्दी व्यवस्थापन, पर्यटक सुविधा नियोजन करण्यात येणार आहे. जतन आणि संवर्धन कामांमध्ये अनियोजित अनावश्यक जोडण्या काढणे, पाणी गळती रोखणे, दगडी बांधकाम आवश्यकतेनुसार दुरूस्त करणे, मंदीर परिसरातील दीपमाळांची पुनर्बांधणी करणे आदी कामे हाती घेण्यात येणार आहेत, असे राव यांनी सांगितले.

### अक्कलकोटचाही चेहरमोहरा बदलणार...

दरम्यान, यावेळी अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबत चर्चा झाली. यावेळी ३६८ कोटी ७१ लाख रुपयांच्या आराखड्यामध्ये करण्यात येणाऱ्या कामांबाबत चर्चा झाली. वाहनतळ, रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक त्या भुसंपादनाला मंजुरी यावेळी देण्यात आली. प्रस्तावित आराखड्यमध्ये वाहनतळ, वॉटर एटीएम, रस्ते विकास, शौचालय निर्मिती, हत्ती तलाव उद्यानांचा विकास, व्यापारी केंद्र, भक्त निवास, चौक सुशोभीकरण या कामांचा समावेश आहे.

## उद्या सोलापुरात होणार भाजपचा मेळावा

✔ सुराज्य/सोलापूर

### पदाधिकाऱ्यांना ही उत्तरे मिळणार का?

शहर- जिल्हाध्यक्ष बदलणार का तेच राहणार, सोलापूर लोकसभेचा उमेदवार कोण राहणार, महापालिका निवडणुकीसाठी कोणती रणनिती ठरणार, अनेक वर्षांपासून दोन्ही आमदारांमधील वाद मिटणार कधी यासह विविध प्रश्नांची उत्तरे भाजप पदाधिकाऱ्यांना या फडणवीस यांच्या महत्वाच्या दौऱ्यात अपेक्षित आहेत.

आगामी विविध निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील राजकीय वातावरण गरम होताना दिसत आहे. राष्ट्रवादीचे खा. शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यानंतर आता भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. गुरूवार, २१ मे रोजी सायंकाळी ४ वाजता शहरात हेरिटेज मंगल कार्यालयात भाजप कार्यकर्त्यांचा मेळावा होणार आहे. यावेळी फडणवीस विरोधकांना काय उत्तर देणार आणि कार्यकर्त्यांना कोणता सल्ला देणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

सोलापूर शहरात पंधरा दिवसांपूर्वी खा.शरद पवार सोलापुरात आले होते. यावेळी त्यांनी शहरातील राजकीय परिस्थितीचा आढावा पदाधिकाऱ्यांकडून घेतला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सोलापूर लोकसभेची जागा राष्ट्रवादीला सोडवून घ्यावी, अशी मागणी केली. त्यानंतर चार दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी मेळावा घेत भाजपवर सडकून टिका करत स्वबळावर लढण्याचे संकेत दिले होते. यावेळी काँग्रेसचे डझनभर नेते मेळाव्याला उपस्थित होते. सर्वांनीच भाजपाचा समाचार घेतला होता. यावर स्थानिक भाजप नेत्यांनी कोणतेही उत्तर न देता मौन बाळगले होते. आता गुरूवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापुरात येत असून विविध विकास कामांचे उद्घाटन करत व कार्यकर्त्यांचा मेळावाही घेणा आहेत.

दुपारी ४ वाजता हेरिटेज गार्डन येथे मेळावा घेणार असून यामध्ये फडणवीस काँग्रेस आणि राष्ट्रवादीला कशा प्रकारे उत्तर देणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. फडणवीस यांच्या उपस्थितीत शहर व ग्रामीण कार्यकर्त्यांचा मेळावा होणार आहे. या मेळाव्यास पदाधिकाऱ्यांसह शक्ती केंद्रप्रमुख प्रमुख, बूथ प्रमुखांनी उपस्थित रहावे, असे आवाहन शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी केले आहे.

## गाडीला कट का मारला अन् जीव गमावून बसला
### सांगोल्यात तरूणाचा चाकूने भोसकून खून

✔ सुराज्य/सांगोला



दुचाकी वाहनास कट का मारला म्हणून चार चाकी वाहनाच्या चालकाशी हुज्जत घालण्याच्या कारणावरून रागाच्या भरात अमोल विश्वास लवटे (वय २३) यास शिवाजी पवार याने चाकूने भोसकून जीवे ठार मारल्याची घटना सोमवार २२ मे रोजी रात्री आठच्या सुमारास वाकी घेरडी येथील भर चौकात घडल्याने खळबळ उडाली आहे

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की- वाकी घेरडी येथील अमोल विश्वास लवटे व चुलत भाऊ महेश लवटे हे दोघेजण एम एच १३ ए ए १९७८ या मोटारसायकलवर चालले होते. सांगोला येथून मुंबईला जाणाऱ्या ट्रॅव्हल्स मधून मावशी चालली म्हणून तिला ज्वारी देण्यास हे दोघे निघाले होते तर इनोव्हा एम एच बारा सीआर ९७५९ च्या गाडीचा चालक शरद शिवाजी पवार, शिवाजी पवार, भारत पवार हे सांगोला वरून वाकी घेरडीकडे येत असताना चौकात मोटरसायकल वरील अमोल लवटे व पवार यांच्या दोघात कट मारण्याच्या कारणावरून बाचाबाची झाली. शरद व भारत पवार यांना अमोल यास धरून ठेवण्यास सांगून शिवाजी पवार घरी गेला. घरातून शांताबाई पवार व विजूबाई जाधव यांनी मिरचीची पूड घेतली व शिवाजीने धारदार चाकू घेऊन घटनास्थळी आले. अमोलच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकली व शिवाजी पवार यांनी अमोल याच्या पोटात चाकू खुपसून गंभीर जखमी करून खून केला. सदर घटनेची फिर्याद मोहन केराप्पा लवटे यांनी शिवाजी पवार शरद शिवाजी पवार भारत शिवाजी पवार शांताबाई शिवाजी पवार विजू जाधव यांचे विरुद्ध फिर्यादी असून दोन महिलांना ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपी शिवाजी पवार अद्याप फरार असून पोलीस तपास करीत आहे

सदर घटनेबाबत पोलीस पाटील राजू पटेल यांनी त्वरित सांगोला पोलीस स्टेशनला माहिती दिल्याने घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील, पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी हे त्वरित पोचल्याने पुढील अनर्थ टळला सदर घटनेचा तपास सपोनी सचिन जगताप करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी पित्यासह महिलेस २६ मे पर्यंत पोलीस कोठडी

✔ सुराज्य/सोलापूर



अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी पित्यासह एका महिलेस २६ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.पैशासाठी प्रेमविवाहातून जन्मलेल्या अल्पवयीन मुलीला कला केंद्रात पाठवले.त्यानंतर तिच्यावर कला केंद्रात आलेल्या चौघांनी अत्याचार केला.यामध्ये पिता,कला केंद्रातील पाच चालक व चार इतर ग्राहकांवर पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल दाखल झाला.

याबाबत पिडीतेच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून पित्यासह नऊ जणांवर गुन्हा दाखल झाला.दरम्यान, याप्रकरणी पित्याला व अन्य एका महिलेस अटक करण्यात आली असून,त्यांना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.तर इतर आरोपींचा शोध सुरू असल्याचे जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट यांनी बोलताना सांगितले.

## मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेणारा आरोपी पोलिसाच्या ताब्यात

✔ सुराज्य/सोलापूर

अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिला पळवून नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पीडितेला जेलरोड पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही कारवाई अनैतिक मानवी प्रतिबंधक पथकाने केली आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये एका अल्पवयीन मुलीला आरोपी आकाश अनिल घनवटे (रा. सोलापूर) याने लग्नाचे आमिष दाखवून तिला पळवून नेले होते.या प्रकरणाचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे आल्यानंतर एकाच महिन्यात त्यांनी त्या पीडित मुलीचा शोध लावला. त्यांना पुण्यातून ताब्यात घेतले आहे. ही कारवाई अनैतिक मानवी प्रतिबंध विभागाचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहा.फौ.राजेंद्र बंडगर, सत्तार पटेल, मुजावर, नदाफ, दादा गोरे, प्रकाश गायकवाड, वसीम शेख यांनी केली.

## धोनीच्या चेन्नईची फायनलमध्ये धडक, गुजरातवर विजय

✔ **चेन्नई** : एमएस धोनीच्या नेतृत्वातील चेन्नईने गुजरातचा पारभव करत आयपीएलच्या सोळाव्या हंगामाच्या फायनलमध्ये धडक मारली आहे. चेन्नईने गुजरातचा १५ धावांनी पराभव करत फायनलमध्ये धडक मारली आहे. पराभवानंतर आता गुजरातचा संघ क्वालिफायर २ मध्ये गेलाय. लखनौ आणि मुंबई यांच्यातील विजेता संघ गुजरातसोबत भिडणार आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मागच्या नोटबंदीच्या वेळी बँकेत भरायला दिलेले पैसे तुम्हीं मला अजुन नाही दिलेत !

**कल्याण**
**337-36-178**

**मेन बाजार**
**170-85-690**


## ...आता बस्स झाला उन्हाचा तडाखा!
### वैतागलेल्या सोलापूरकरांना प्रतिक्षा लागलीय, ‘रोहिणी’ची...

✔ सुराज्य/सोलापूर

दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या होरपळीने सोलापूरकर जाम वैतागले आहेत. उकाड्याने घरात तगमग आणि बाहेर प्रखर उन्हामुळे अंगाची लाहीलाही...जायचे तरी कोठे? अक्षरशः उन्हाचा वैताग आला आहे. आता वरुणराजाचे तुषार अंगावर झेलायला सोलापूरकर उत्सुक झाले आहेत. अख्ख्या शहराचे लक्ष आकाशाकडे लागले आहे. सोलापूरकरांना प्रतीक्षा लागलीय, ती ‘रोहिणी’च्या आगमनाची...

घरात बसून अंगाची लाहीलाही सहन करत असलेली तरूणाई चिडून कदाचित म्हणेल...ही कोण रोहिणी? मनात आलेल्या प्रश्नाची उकल उत्तराने व्हायलाच हवी. ही रोहिणी म्हणजे कुणी अप्सरा नसून पावसाळ्यातील जी नक्षत्रे आहेत, त्यातील पहिल्या नक्षत्राचे नाव आहे, ‘रोहिणी’. तिचे आगमन २४ वा २५ मे रोजी होत असते. मान्सून अंदमानात आला की, वसंत ऋतूच्या गर्द झाडीत कोकिळेची कुहुकुहु सुरू व्हायला लागते. तिची ही कुहुकुहु म्हणजे हमखास पाऊस येतो, असे सांगतात. कारण कोकिळेला लांबचा पाऊस दिसतो म्हणे. मान्सूनपूर्वी ढगांचा गडगडाट...विजांचा कडकडाट आणि वादळी वारा म्हणजे रोहिणीचे आगमन समजा. ही रोहिणी मान्सूनची आगाही देत असते.

आज २४ मे. आज किंवा गुरूवारी तिचे आगमन होईल. गेल्या दोन दिवसांपासून पारा ४३ अंशांच्या पुढे जरी असला तरी सायंकाळी ढगाळ हवामान दिसून येत आहे. हिरवीगर्द झाडी वाऱ्याने डुलायलेत. निदान सायंकाळचे तरी वातावरण आल्हाददायक असते. हे चित्र पाहिल्यानंतर जाणकार सोलापूरकरांना विशेष करून ग्रामीण भागातील बळीराजाला ‘रोहिणी’ची प्रतीक्षा लागून आहे.



### आजही ‘रोहिणी’वर विश्वास...

मान्सून महाराष्ट्रात ७ जूनलाच येत असतो. हल्ली लहरीपणामुळे तो बिफोर टाईम येत असतो. विज्ञानवाले पावसाळ्याची सुरूवात याच दिवसापासून गृहित धरतात पण ग्रामीण भागात शेतकरीवर्ग रोहिणीपासूनच पावसाळ्याची सुरूवात झाल्याचे गृहीत धरतात. पूर्वी पंचांगकर्ते पाऊसमानाचा अंदाज देताना रोहिणीचा उल्लेख आवर्जून करत असत पण आता होत नाहीय.उल्लेख नाही म्हणून रोहिणी नाही,असे होवू शकेल काय? रोहिणी आहे.सूर्य-चंद्र असेपर्यंत तीही असेल.

### मग प्रार्थना करूयात...

सोलापूरसह सारा जिल्हा पाण्याच्या बाबतीत उजनीवर विसंबून असतो. उजनी फुल्ल झाली की-आपली वर्षभराची काळजी मिटते. त्यात पिण्याचे आणि शेतीचे पाणी आलेच.सध्या उजनी खालावली आहे.त्यामुळे पाऊस व्हायलाच हवा.अन्यथा आपली धडगडत चांगली नाही.तेव्हा रोहिणीकडे कृपेची प्रार्थना करूयात जणेकरून उजनीमाय आनंदी व्हायला हवी.

**‘रोहिणी’चे गुणधर्म... :** पावसाळ्यातील प्रत्येक नक्षत्रांना स्वभावधर्म आहे. त्यातील‘रोहिणी’चा स्वभाव अत्यंत आक्रमक. तिच्या मनात आले तर एक दोन दिवसात ती पाणी पाणी करून टाकते. वादळी वाऱ्याने उलथा पालथ करून टाकते. ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट प्रचंड असतो. रोहिणीच्या एक-दोन पावसाने वैशाख वणवा शमून जातो. ‘रोहिणी’च्या कृपेवर खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून असते. पाऊसमान पाहून शेतकरी खरीप पेरण्यांची तयारी करायला लागतात. रोहिणीची अवकृपा झाली तर ग्रामीण भागात चिंता पसरते. रोहिणी नक्षत्राचा कालावधी ७ जून पर्यंत असतो. पुढे मृग नक्षत्राचे आगमन होते.